**शाखा : JINTUR** **सभासद क्रमांक : 000000**

**प्रति,**

**बुक-पोस्ट**

# सावजी बँक

सदैव आपल्या सोबत.

**सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप. बँक लि; जिंतूर**

मुख्य कार्यालय, ए. पी. एम. सी. मार्केट यार्ड, जिंतूर ४३१५०९ जि. परभणी

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस सन २०२४-२०२५ (फक्त सभासदांकरीता)

**जा.क्र./मु.का./प्रशासन/ /२०२५-२६** **दिनांक**:- ०१ जुलै, २०२५

सन्माननिय सभासद, आपणास कळविण्यात येते की, **सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप.बँक लि., जिंतूर** या बँकेची ६० वी वार्षिक सर्वसाधारण **सभा रविवार दिनांक ०३ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता माऊली मंगल कार्यालय, जिंतूर** येथे घेण्यात येणार आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

**<u>सभेपुढील विषय:</u>**

१. दिनांक ०४ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे ईतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३. अ) सन २०२४-२०२५ चे अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
   ब) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रकास मान्यता देणे.
४. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२५ च्या नफा वाटणीस मान्यता देणे.
५. सन २०२४-२५ सालचा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल स्विकारणे.
६. सन २०२३-२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
७. अ) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखा परीक्षकाची नेमणूक करणे बाबत.
   ब) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत तपासणीसाच्या नियुक्ती बाबत.
८. बँकेचे उपविधी क्रं.७ नुसार मॅक्झीमम् बॉरोईंग पॉवर ठरविणे बाबत.
९. १००% तरतुद असलेल्या संशयित व बुडीत वर्गवारीतील कर्ज खात्यांच्या वसुलीचा हक्क अबाधित ठेवून, निर्लेखन करण्यास मान्यता मिळण्याबाबत.
१०. एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत थकित कर्ज खात्यातील वसुलीची नोंद घेणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१२. मा.अध्यक्ष यांचे परवानगीने ईतर ऐनवेळी येणारे विषय.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरून
स्वाक्षरीत
मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : ०१ जुलै, २०२५
स्थळ : जिंतूर

**विशेष सूचना:**

०१. गणपुर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज नियुक्त ठिकाणीच उपरोक्त वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरु होईल. त्यावेळी गणपूर्तीची व वेगळ्या सुचनेची आवश्यकता असणार नाही.
०२. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांचे अनुषंगाने प्रश्न, सूचना अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती अपेक्षित असेल, त्यांनी दिनांक २५ जुलै, २०२५ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ए.पी.एम.सी. मार्केट यार्ड, येलदरी रोड, जिंतूर या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरुपात कळवावे. **प्रश्नकर्त्याने आपण स्वतः थकबाकीदार अथवा थकबाकीदाराचे जामीनदार नाही तसेच शेअर्सची किमान रक्कम पूर्ण भरलेली आहे, हे पाहावे.**
०३. सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता बँकेस पुराव्यासह व आधारकार्डसह ताबडतोब कळवावा. तसेच ज्या सभासदांनी आपल्या शेअर्ससाठी नॉमिनेशन केले नाही त्यांनी ते करुन घ्यावे ही विनंती.
०४. वार्षिक अहवाल २०२४.२५ हा बँकेच्या सर्व शाखा कार्यालय, मुख्य कार्यालय तसेच बँकेचे संकेत स्थळ www.sundarlalsawjibank.com यावर दिनांक १८ जुलै, २०२५ पासुन उपलब्ध असेल. तरी आपण वरिल कोणत्याही ठिकाणाहुन उपलब्ध करून घेऊ शकता.